मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# जादूचा नारळ

BVBK-0400364

# जादूचा नारळ

— लेखक —

श्री. दत्ताराम आ. बारसकर

क्र. ३६४

जयहिंद प्रकाशन
झावबावाडी, मुंबई

BVBK-0400364

मूल्य ५० पैसे

* मुद्रक
वि. ज. देसाई
वैभव प्रिंटिंग प्रेस
मुंबई नं. ४

*

* प्रकाशक
रवींद्र गजानन रायकर
जयहिंद प्रकाशन
१० बी, झावबाची वाडी
ठाकुरद्वार, मुंबई २

*

* प्रथमावृत्ती
१९ मार्च १९७१

* द्वितीया आवृत्ति
१५ नोव्हेंबर १९७७

*

* मुखपृष्ठ
आर्ट कॉर्नर
गिरगांव, मुंबई ४

## दोन शब्द

**करी मनोरंजन जो मुलांचें ।**
**जडेल नातें प्रभुशीं तयांचें ॥**

शिक्षणाचा प्रसार वाढतो आहे, लोकसंख्या वाढते आहे, त्याबरोबरच सध्यां शिकणाऱ्या आणि अल्प-शिक्षित अशा दोघांनाही योग्य असें वाचनीय वाङ्मय उपलब्ध करून देणें जरुरीचें झालें आहे. त्या बालमनाला आणि अन्य साक्षरांना रुचतील, त्यांच्या मनाची पटकन पकड घेतील, अशींच पुस्तकें त्यांच्या हातीं दिलीं पाहिजेत. एवढेंच नव्हें, तर तीं पुस्तकें छोटीं छोटीं असावयास पाहिजेत; तसेंच त्यांची किंमतही अल्प असावयास पाहिजे.

राक्षसांच्या गोष्टी, जादूच्या गोष्टी, भुतांखेतांच्या गोष्टी, धार्मिक गोष्टी मुलें व मोठीं माणसेंही अत्यंत आवडीनें वाचतात. ही वस्तुस्थिति ध्यानांत घेऊन अशीं प्रकाशनें प्रसिद्ध करण्याची ही योजना मराठींमध्यें तरी अपूर्व अशी आहे. तीन रंगी बाह्यचित्रें, आंतील विषयानुरूप चित्रें आणि सुंदर छपाई, यामुळें तीं चटकन उचलून सर्वांना वाचावींशीं वाटतील. हे पुस्तक मुलांना फार आवडेल.

—प्रकाशक

# वामन भटजी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. संतोषपूर नांवाचे एक नगर होते. त्या नगरातील सर्व प्रजा संतोषी आणि सुखी होती. कारण त्या नगराचा राजा सुखदेव आणि राणी मायावती ही दोघे अत्यंत दयाळू व दानशूर होतीं, राजा–राणीला एक मुलगा होता आठ नऊ वर्षांचा. त्याचे नांव होते संतोषकुमार.

राजा सुखदेव न्यायानें, सत्याने व धर्माने वागे. प्रजेवर त्याचे खूप प्रेम होते. दर सोमवारी तो आपल्या नगरीत नगर-भोजनाचा कार्यक्रम करीत असे. या कार्यक्रमात हजारो गोरगरीबांना मिष्टान्न भोजन जेवायला मिळे. जेवण झाल्यावर प्रत्येकाला एक मोहर दक्षिणा मिळे. लोक राजाला भरल्या पोटाने व संतोषी मनाने आशीर्वाद देऊन निघून जात.

संतोषपूर नगराच्या वेशीवर एक छोटेसे खेडेगाव होते. त्या गावचे नाव होते देवगाव. देवगावात एक गरीब ब्राम्हण रहात होता. त्याचे नाव होते वामन. त्याला सर्वजण वामन भटजी म्हणूनच ओळखीत व त्याच नावाने हांक मारीत असत. वामनभटजीला बायको होती व एक मुलगी होती. बायकोचे नांव होते सत्यवती व मुलीचे नांव होते मंगला! मंगला ही अत्यंत देखणी व गुणी होती. तिचे वय आठ नऊ वर्षांचे होते.


वामनभटजी गावात कुणाकडे लग्नकार्य असले, सत्यनारा-यणाची पूजा असली किंवा कसला तरी एखादा धार्मिक विधी

असला की जात. ते लग्न लावीत, सत्यनारायणाची पूजा व पोथी सांगत, धार्मिक विधी करीत व चार पैसे मिळवून आणत. आपल्या कुटुंबाचे पोषण करत. त्यांचे तसे बरे चालले होते. ते गरीब होते पण प्रामाणिक होते. त्यांचा स्वभावही मनमिळावू व प्रेमळ होता. एकदा तर त्यांचा प्रामाणिकपणा साऱ्या गावभर गाजला होता. त्याचे असे झाले.—

देवगावात एक खूप श्रीमंत गृहस्थ होते. त्यांचे नांव लक्ष्मीकांत. त्यांच्याकडे एकदा लग्नकार्य होते. वामनभटजींना गोड पदार्थ बनविण्यासाठी त्यांनी बोलावले होते. जेवणात गोड पदार्थ म्हणून जिलब्या बनविण्यात आल्या होत्या. वामन भटजी जिलब्या बनविण्यात मग्न झाले होते. आणि ते ताटात तयार करून ठेवीत असलेल्या जिलब्या लक्ष्मीकांतांच्या पत्नी कांचनबाई या बाहेर पंक्तीत जेवायला बसलेल्या पाहुणे मंडळीला वाढीत होत्या. लक्ष्मीकांत आग्रहाने पाहुण्यांना जिलब्या घ्यायला भाग पाडीत होते. त्यामुळे जिलब्या बनविण्यात आणि त्या बाहेर आणण्यात वामन भटजी व कांचनबाई दोघेही गुंतली असल्याने त्यांना इतर कशाचेही भान राहिले नव्हते.

कांचनबाईंनी स्वतःच्या घरी लग्नकार्य असल्याने अंगावर उंची वस्त्रे व सर्व दागिने घातले होते. त्यांच्या नाकात नथ होती. गळ्यात बोरमाळ होती. कानात मोत्यांची कुडी होती. हातात प्रत्येकी दोन दोन पाटल्या होत्या. बोटातून मौल्यवान हिऱ्यांच्या आंगठ्या होत्या. कमरेला चांदीचा सुंदर कमरपट्टा

होता आणि पायात छुमछुम वाजणारे पैंजण होते. पायांच्या बोटांत मासोळ्या होत्या.



ताटातील तयार जिलब्या उचलताना कांचनबाईंच्या एका हातातील एक पाटली ताटात पडली पण ही गोष्ट कांचन-बाईंच्या लक्षात आली नाही. वामनभटजींनी जिलबी समजून ती पाटली कढईत सोडली. आगीची व उकळत्या तेलाची झळ त्या सोन्याच्या पाटलीस लागताच ती चकाकू लागली. कढईत चमकणारी ती पाटली वामनभटजींनी पाहिली व ते आश्चर्यांत पडले. त्यांनी ती तशीच बाहेर काढली व थंड झाल्यावर बंडीच्या खिशात ठेवली.

जेवणाचा सर्व कार्यक्रम आटोपल्यावर लक्ष्मीकांत व कांचनबाई

वामनभटजींना मजुरीचे पैसे द्यायला गेलीं. त्यांनी त्यांचे पैसे त्यांच्या हाती ठेवले व हात जोडून म्हटले, " भटजी, आजचा जिलबीचा बेत अतिशय सुंदर झाला. सर्वांनी तुमची स्तुती करीतच जिलब्या खाल्ल्या. "

कांचनबाईंच्या हाताकडे दृष्टिक्षेप टाकीत वामनभटजी म्हणाले, " आनंद आहे ! पण आपल्या या हातात एकच पाटली दिसत आहे. एक कुठे हरवली ? "

त्याबरोबर कांचनबाईंनी चटकन आपल्या दोन्ही हातांकडे पाहिले आणि त्या एकदम घाबरून गेल्या व म्हणाल्या, " अगबाई, खरंच की, या उजव्या हातातली एक पाटली कुठे हरवली माझी ? "

आणि मग त्यांनी भराभर अग ए सुमा, कृष्णे, चंचलाऽ ऽ अशा नांवानें हांका मारून आपल्या लेकी, सुना, जावा यांना बोलावले. त्यांच्या घाबरलेल्या आवाजाच्या हांका ऐकताच सर्व मुली व बायका यांचा घोळका त्यांच्या भोवती जमा झाला. काही पुरुष मंडळीसुद्धां तिथे आली. मग त्यांना हिरमुसल्या चेहऱ्याने कांचनबाईंनी आपल्या हातातील एक पाटली हरवल्याचे सांगितले. सर्वांनी शोधाशोध सुरू केली. तेव्हा वामन भटजी कांचनबाईंना म्हणाले, " बाई अशा घाबरून आणि गोंधळून जाऊ नका, आणि व्यर्थ शोधाशोध सुद्धा करू नका. तुमची पाटली अगदी सुरक्षित आहे. "

" कुठे आहे ती ? " कांचनबाईंनी विचारले. तसे वामन-

भटजींनी आपल्या बंडीच्या खिशातून पाटली काढून त्यांच्या हाती दिली आणि मग घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला.

वामनभटजींनी पाटली परत देताच लक्ष्मीकांतांनी आणि कांचनबाईंनी त्यांचे आभार मानीत म्हटले, "बरं झालं तुम्हालाच सांपडली म्हणून नाहीतर,"

लक्ष्मीकांतांनी सदऱ्याच्या खिशात हात घातला. एक मोहर बाहेर काढली नि वामनभटजींच्या हातावर ठेवीत म्हटले, "भटजी, हे घ्या तुम्हाला बक्षिस."

"अहं. बक्षिस वगैरे काही नको बरं," ती मोहर परत देत वामनभटजी म्हणाले.

"राहू द्या हो, ठेवा." असा जेव्हा तेथे जमलेल्या सगळ्यांनी आग्रहच केला, तेव्हा मग ती मोहर घेऊन वामनभटजी घरी आले.

असे होते वामनभटजी. गरीब, परंतु अत्यंत प्रामाणिक. दुसऱ्यांच्या वस्तूचा मोह न धरणारे !

वामनभटजी ईश्वरभक्त होते. एकादशीचा, संकष्टीचा उपवास न विसरता ते करीत. सोमवारी ते श्रीमहादेवाच्या मंदिरात जात. पिंडीवर अभिषेक करीत. शनिवारी मारुतीरायाचे दर्शन घेत. त्याला रुईच्या पानांची माळ घालीत. ईश्वरावर त्यांची मोठी श्रद्धा होती.

एके दिवशी वामनभटजी एका घरी श्रीसत्यनारायणाच्या पूजेला गेले होते. तेथून येताना त्यांनी बरेच नारळ झोळीतून आणले होते. नारळाची ती झोळी त्यांनी खुंटीला टांगून

ठेवली होती. दुसऱ्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. संकष्टीला वामनभटजी गणपतीला एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवीत. त्या दिवशीही त्यांनी नैवेद्याकरिता सायंकाळच्या वेळी झोळीतील नारळ फोडण्यासाठी बाहेर काढले व एक एक नारळ फोडू लागले. दोन तीन नारळ फोडून झाल्यावर त्यांनी झोळीतून एक नारळ बाहेर काढला व ते त्याच्यावर कोयतीचा घाव घालणार तोच त्या नारळातून हाताच्या अंगठ्याएवढा एक पुरुष बाहेर आला आणि हात जोडून वामनभटजींना म्हणाला, " भटजी, कृपा करा नि मला फोडू नका. मला जीवदान द्या. मी जादूचा नारळ आहे. मी तुमचे उपकार विसरणार नाही. तुमचे कल्याण करीन, तुमची गरीबी दूर करीन. तुमचा प्रामाणिकपणा व चांगुलपणा पाहूनच मी तुमच्याकडे आलो आहे. "

नारळातून निर्माण झालेला तो अंगठ्याएवढा पुरुष पाहून आणि त्याची विनवणी ऐकून वामनभटजींना मोठे आश्चर्य वाटले. पण त्यांच्या मनांत शंका आली; ' ही भूतचेष्टा तर नसावी ?' त्यांनी त्या नारळातून निर्माण होऊन पुढे उभ्या राहिलेल्या चिमुरड्या पुरुषाला म्हटले, ' तूं जादूचा नारळ आहेस यावर मी विश्वास कसा ठेऊ ? मला तुझी जादू दाखव पाहू आधी. '

नारळ म्हणाला, " भटजी, असे बावरून जाऊ नका. मी जे सांगेन त्यावर विश्वास ठेवा. मला भविष्य वर्तविता येते. पुढे जे काही होणार असेल ते मी तुम्हाला आधी सांगेन. तसेच तुमची जी इच्छा तुम्ही माझ्याजवळ बोलून दाखवाल ती मी त्वरित पुरी करीन. मला तीन डोळे आहेत. या तीन

डोळ्यांचा तीन तऱ्हेने तुम्हाला उपयोग होईल. एका डोळ्यातून तुम्हाला द्रव पदार्थांची प्राप्ती होईल. म्हणजे पाणी, दुध, तेल, मध अशा स्वरूपाचे पदार्थ तुम्हाला हवे असतील तेव्हा मिळतील. दुसऱ्या डोळ्यातून तुम्हांला स्वर ऐकायला येतील. गायनाचे, वादनाचे आणि तिसऱ्या डोळ्याने एखादी हरवलेली किंवा लपवून ठेवलेली वस्तु कुठे आहे हे तुम्ही पाहू शकाल."

नारळाने आपली अशी माहिती व उपयुक्तता सांगताच वामनभटजींना फार आनंद झाला. त्यांनी मग त्याला म्हटले, 'तुझ्या रूपाने आज माझ्या घरी देव गणपतीच आला आहे. 'ऋद्धीसिद्धी ज्याच्या दासी । काय उणे तयापाशी ॥' असा तो गजानन मला आज संकष्टीला पावला आहे. मी तुझा सांभाळ जिवापलिकडे करीन."

वामनभटजींनी त्याला असे सांगताच तो चिमुरडा पुरुष गुप्त झाला. मग त्या रात्री संकष्टीच्या उपवासासाठी वामनभटजींनी त्या जादूच्या नारळाचा उपयोग करून घेतला. त्याच्या द्रव पदार्थ देणाऱ्या डोळ्यांवाटे त्यांनीं तेल, तूप, दुध, निर्माण करून घेतले. आरतीच्या वेळी त्याच्या दुसऱ्या डोळ्यातून तबला, टाळ, झांज यांचे आवाज काढून घेतले. त्या जादूच्या नारळाचे हे सर्व चमत्कार पाहून वामनभटजी, त्यांची बायको सत्यवती आणि मुलगी मंगला तिघेही आनंदित झालीं आणि आता या जादूच्या नारळाविषयी आपण तिघांनीही कुठेही व कधींही तोंडातून एक शब्दही काढायचा नाही असे मनाशी ठरवून तीं सर्वजण ईश्वराचे आभार मानून झोपी गेलीं.

## स्वप्नातील दृष्टांत

वामनभटजींना जादूचा नारळ मिळाल्यापासून त्यांचे दिवस अगदीं मजेत जाऊ लागले होते. त्या जादूच्या नारळाच्या फक्त एकाच डोळ्याचा उपयोग ते स्वतःसाठी करून घेत होते. फक्त द्रव पदार्थ देणाऱ्या डोळ्याचा. त्या डोळ्यातून ते रोज प्रमाणशीर चार हंडे दुध घेत व ते गावाला दुध पुरवीत. त्यांना चार पैसे मिळू लागले होते. घरीही ते भरपूर दुध, तेल वापरण्याकरिता त्या नारळाकडून मिळवीत असत. कुणी याबाबत त्यांना विचारले तर सांगत, "मी पहाटे उठून संतोष-पुरला जातो. दुधाचे हंडे घेऊन येतो. काही तरी केले पाहिजे ना ? काम केल्याशिवाय, हातपाय हलविल्याशिवाय का चार पैसे मिळणार आहेत ?"

एके दिवशी रात्री वामनभटजी झोपले असता त्यांना एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात त्यांना आपल्याजवळील जादूचा नारळ दिसला व त्यातून पहिल्या दिवशी निर्माण झालेला तो चिमुरडा पुरुष त्यांच्यापुढे उभा राहून त्यांना म्हणाला, "भटजी, मी जादूचा नारळ बोलतोय. मी काय सांगतोय ते नीट ध्यानात ठेवा. तुमचे आता आहेत त्याहून अधिक चांगले सुखाचे दिवस येणार आहेत. अगदी लवकरच तुम्हाला राजदरबारी मान-सन्मानाचा योग येणार आहे. राजा सुखदेवाच्या पाक-शाळेतील मुख्य आचारी सध्या खूप आजारी आहे. त्याचा मृत्युकाळ अगदी जवळ आला आहे. तो मरण पावल्यावर

तुम्हाला राजा सुखदेवाचे बोलावणे येईल. तुम्ही राजाला जाऊन भेटा. तो तुम्हाला आपल्या पाकशाळेत मुख्य आचाऱ्याच्या नोकरीला ठेवून घेईल. तुम्ही त्या जागीं रहा. तुमचे भले होईल. नोकरीत मी तुमच्या नेहमीच उपयोगी पडेन ."

इतके सांगून तो चिमुरडा पुरुष गुप्त झाला. वामनभटजी झोपेतून खाडकन् जागे झाले. त्यांनी आपल्या बायकोला उठविले. तिला स्वप्नातला सारा प्रकार सांगितला. त्यांची बायको म्हणाली, ईश्वराच्या मनांत असेल तसे घडेल. मात्र आपल्याकडे जादूचा नारळ आल्यापासून आपल्या आयुष्यात सुखाचे दिवस येत चालले आहेत ही सर्व ईश्वराचीच दया आहे. स्वप्नावर विश्वास ठेवा आणि नारळाच्या सांगण्या-प्रमाणे वागा."

इकडे संतोषपुरात काय घडले आहे ठाऊक ? राजा सुखदेवाच्या पाकशाळेतील आचारी खरोखरच आजारी होता. त्याच्यावर औषधोपचार चालू होते पण गुण काहीच येत नव्हता. त्याच्या आजारपणामुळे राजा सुखदेवच्या दर सोमवारच्या नगरभोजनाच्या कार्यक्रमात मोठी पंचाईत पडत होती. तो बरा व्हावा म्हणून राजाने अमाप पैसा खर्च केला, परंतु शेवटी तो मरण पावला. तो मरण पावला तो दिवस रविवारचा होता. सोमवारी नगरभोजन घालायचे होते. राजापुढे प्रश्न उभा राहिला. काय करायचे ? कुशल आचारी आणायचा कोण आणि कुठून ? जर सोमवारी आपण नगरभोजन घातले नाही

तर आपल्या व्रतात खंड पडणार! आपली पुण्याई संपुष्टात येणार. त्या दिवशी रात्री काही केल्या राजाला झोपच येईना. रात्रभर तो या कुशीवरून त्या कुशीवर सारखा तळमळत होता. तो बेचैन झाला होता. अस्वस्थ झाला होता. मात्र पहाटेच्या वेळी त्याचा डोळा लागला आणि नंतर झोपेत त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात तो जादूच्या नारळातील पुरुष त्याला दिसला आणि त्याने त्याला सांगितले,

" राजा सुखदेवा, फिकीर करू नकोस. तुझे सोमवारचे नगरभोजनाचे व्रत अखंड चालूच रहाणार आहे. उद्या सकाळचाही कार्यक्रम व्यवस्थित पार पडेल. मी सांगतो ते नीट लक्षात घे. तुझ्या संतोषपूर नगराच्या वेशीवर देवगाव नांवाचे गाव आहे. त्या गावांत अत्यंत गरीब परंतु प्रामाणिक असे वामनभटजी रहातात. त्यांना दूत पाठवून बोलावून घे आणि तुझ्या पाकशाळेतील मरण पावलेल्या आचाऱ्याच्या जागेवर त्यांना नोकरीला ठेव."

इतके सांगून तो जादूचा नारळातील पुरुष अदृश्य झाला. तो पुरुष नाहीसा होताच राजा सुखदेवाने डोळे उघडले. तो जागा झाला व तावडतोब त्याने स्वप्नातील दृष्टांत राणी मायावतीला सांगितला. मायावती चाणाक्ष होती. ती म्हणाली, " महाराज, आपली पुण्याई सबळ आहे. म्हणूनच कुणातरी सिद्धपुरुषाने स्वप्नात दृष्टांत दिला आहे. आता सकाळ होताच दूताला देवगावाला पाठवा नि त्या भटजींना बोलावून घ्या. नोकरीला ठेवून घ्या."

सकाळ होताच राजा सुखदेवाने राजदूताला महालात बोलावून घेतले आणि त्याच्या जवळ एक लखोटा देऊन त्याला देवगावात वामनभटजींकडे पाठविले. राजदूताने देवगावात जाऊन राजाचा तो लखोटा वामनभटजींना दिला. तो लखोटा उघडून वामनभटजींनी वाचला. आपणाला राजाने बोलावले असे समजताच त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी आपली बायको सत्यवती व मुलगी मंगला यांना लखोटा वाचून दाखविला. त्यांनाही आनंद झाला. वामन भटजींनी मग तो आपला जादूचा नारळ बरोबर घेतला आणि ते त्या आपणास बोलावण्यास आलेल्या राजदूताबरोबर संतोषपुराला रवाना झाले.

संतोषपुराला आल्यावर राजाने वामनभटजींची मोठ्या सन्मानाने ऊठबस केली. आपुलकीने व प्रेमानें त्यांची चौकशी केली व त्यांना आपल्या पाकशाळेत मुख्य आचारी म्हणून नोकरीस ठेवले. त्या दिवसापासून वामन भटजींच्या व्यवस्थेखाली दर सोमवारचा नगर भोजनाचा राजाचा कार्यक्रम पार पडू लागला. पाकशाळेत स्वयंपाक तयार करताना जादूच्या नारळाचा वामन भटजींना खूपच उपयोग होत असे. नारळाच्या जादूच्या जोरावर स्वयंपाकात प्रमाणशीर पदार्थ पडत व स्वयंपाक अगदी कमी वेळात तयार होत असे व अत्यंत रुचकर असा स्वयंपाक होई.

राजाच्या पाकशाळेत आचारी म्हणून नोकरीस राहिल्याने वामनभटजींना नगरात चांगला मान मिळू लागला होता, व त्यांना चांगला पैसाही मिळत होता. पण एकाचे चांगले

झालेले दुसऱ्याला कधी पहावत नाही. वामनभटजींच्या बाबती-तही असेच घडले. पाकशाळेत एक नोकर होता. विचित्रसेन याचे नाव. त्या विचित्रसेनास वामनभटजींची भरभराट पहावेना. त्याने त्यांच्या जादूच्या नारळाचा सारा प्रताप एकदा चोरून पाहिला होता. तेव्हापासून त्याच्या मनात होते की केव्हातरी संधि साधून वामनभटजींचा जादूचा नारळ पळवायचा. एके दिवशी रात्री त्याने पाकशाळेतील मीठ, तूप, मसाला वगैरे पदार्थात विषारी पदार्थ मिसळून ठेवले व राजास खोटेच सांगितलें की, " महाराज, माझी आई फार आजारी आहे तिला भेटण्यास मी जातो. तरी मला आपण रजा द्यावी. राजाने त्याला रजा दिली. मग तो विचित्रसेन वामनभटजी झोपलेले असताना रातोरात त्यांचा जादूचा नारळ घेऊन पसार झाला.

दुसऱ्या दिवशी सोमवार उजाडला. वामन भटजी स्वयंपाकास लागले पण पहातात तो आपला जादूचा नारळ नाही. ते एकदम घाबरले. आता कसे व्हायचे ? त्यांच्यापुढे पेच पडला. काहीतरी संकट येणार हे त्यांनी जाणले. पण नशिबावर हवाला टाकून ते आपल्या कामास लागले. स्वयंपाक तयार झाला. माणसे जेवायला बसली. जेवून उठली पण अन्न पदार्थात विचित्रसेनाने विषारी पदार्थ मिसळून ठेवलेला असल्याने त्याचा परिणाम तात्काळ माणसांवर झाला. त्यांना चक्कर येऊ लागली. उलट्या जुलाब होऊ लागले. काही माणसे तर मृत्युमुखी सुद्धा पडलीं. राजाने चौकशी केली. वामन भटजी दुःखी झाले. त्यांना राजाने जाब विचारता

ते म्हणाले, “महाराज, खरोखरच माझ्या हातून काहीच वाईट गोष्ट घडलेली नाही. मला यातले काहीच ठाऊक नव्हते.”

ज्या वामन भटजींना राजाने मानाने बोलावून आणले होते आणि नोकरीस ठेवून मानाने वागविले होते त्याच वामन-भटजींवर राजाने अविश्वास दाखविला व त्यांचा अपमान करून त्यांना तात्काळ नोकरीवरून दूर केलें. बिचारे वामन भटजी! दैवाला दोष देत कपाळाला हात लावून, दुःखी होऊन देवगावास ते परतले. आपला जादूचा नारळ व नोकरी गमावून.

जादूचा नारळ नाहीसा झाल्यापासून वामनभटजींना वाईट दिवस आले. ते मग घराबाहेर पडेनासे झाले. पण असे असले तरी आपल्यापाशी जादूचा नारळ होता असे मात्र त्यांनी कधीही आणि कुठेही, कुणालासुद्धा बोलून दाखविले नाही.

## नारळ पुन्हा मिळतो—राजपुत्र नाहीसा होतो

विचित्रसेन नारळ घेऊन आपल्या गावी गेला. त्याला मनातून वाटले की, आता आपण वामनभटजींचा हा जादूचा नारळ पळवून आणला आहे. त्याच्या जादूच्या जोरावर नाना तऱ्हेचे चमत्कार करू. पण ज्याच्या मनात मांडे त्याच्या पदरात धोंडे या न्यायाने सारे उलटे झाले. कारण सत्याने, न्यायाने वागणाऱ्या प्रेमळ व गरीब अशा माणसाच्या कल्याणासाठी त्या नारळाची जादु उपयोगाला येत होती व म्हणून तो मिळाल्यापासून वामनभटजींची भरभराट झाली

होती. पण दुष्टबुद्धीच्या विचित्रसेनाला हे कसे समजावे ? त्याने त्या जादूच्या नारळाची पूजा केली. प्रार्थना केली व फलाची अपेक्षा केली. पण त्या नारळाचा बिलकूल उपयोग होईना. ते पाहून विचित्रसेनाला त्याचा राग आला. आपण या नारळाच्या लोभाने आई आजारी असल्याची थाप राजाला ठोकून रजा घेऊन इकडे आलो पण आता परत संतोषपुरात राजा सुखदेवाकडे जावे तर तेथेही आपणाला थारा मिळणार नाही. कारण ज्या दिवशी रात्री आपण नारळ चोरून पळून आलो त्याच दिवशी सकाळी आपली चोरी सर्वांना माहीत झालेली असणार ! या जाणिवेनें विचित्रसेनाची मोठी विचित्र स्थिती झाली. शेवटी त्याने रागाने तो जादूचा नारळ उचलला आणि समुद्रात फेकून दिला.



देवगावापासून अगदी जवळच समुद्रकिनारा होता. तेथे दर शनिवारी व सोमवारी पहाटे वामनभटजी स्नान करण्यासाठी जात असत. एका शनिवारी ते समुद्रावर स्नानासाठी गेले असता समुद्राच्या पाण्यातून एक नारळ वहात येताना त्यांना दिसला. त्यांनी पुढे होऊन तो नारळ उचलला. तेवढ्यात तो नारळ बोलू लागला. तो म्हणाला, " भटजी, मला तुम्ही ओळखलेत का ? मीच तुमचा जादूचा नारळ. काय योगायोग आला पहा. पुन्हा आपण एकत्र आलोच की ! "

नारळाचा परिचित स्वर कानी पडताच वामनभटजी आनंदित झाले व लहान मुलासारखे उड्या मारीतच ते घरी आले.

घरी आल्यावर त्यांनी घडलेला सर्व प्रकार सत्यवती व मंगला यांना सांगितला व त्यांना तो जादूचा नारळ दाखविला. त्या हरवलेल्या नारळाचं पुन्हा दर्शन घडताच त्यांना आनंद झाला.

याच वेळी संतोषपुरनगरीत एक दुर्घटना घडली. राजपुत्र संतोषकुमार राजबागेत आपल्या निवडक सवंगड्यांबरोबर खेळत असता एकाएकी वादळ आले. धुळीचे लोट उसळले. आकाशात कसला तरी मोठा आवाज झाला आणि एक भला मोठा राक्षस आकाशातून बागेत उतरला. क्षणाचाही विलंब न लावता त्याने राजपुत्र संतोषकुमारला उचलले. खांद्यावर टाकले आणि तो पुन्हा आकाशात उडाला व त्याला घेऊन आकाशमार्गे पसार झाला. राक्षसाने राजपुत्राला पळवून नेल्याची बातमी हा हा म्हणता सर्व नगरीत पसरली. त्या बातमीनें नगरीत प्रचंड खळबळ उडाली. हाहा:कार उडाला. राजा सुखदेवाला आणि राणी मायावतीला राजपुत्र नाहीसा झाल्याचे समजताच राणी मूर्च्छा येऊन पडली व

राजा धाय मोकलून रडू लागला. राजवैद्यांनी धावत पुढे होऊन उपचार केले व राणीला शुद्धीवर आणले. प्रधानजी, दिवाणजी व इतर राजाच्या खास मर्जीतल्या व बैठकीतल्या बडया मंडळीने राजाची समजूत घातली व त्याला धीर दिला. राजज्योतिषांनी ज्योतिष शास्त्राच्या पुस्तकाची पाने चाळली आणि लवकरच राजपुत्र सापडेल असे भविष्य वर्तविले.

राजपुत्र संतोषकुमारला पळविणाऱ्या त्या राक्षसाचे नाव होते चक्रदंती. चक्रदंती राक्षस हा अत्यंत दुष्ट व जादुगार राक्षस होता. तो संतोषपुर नगरापासून दहा हजार मैलांवर असलेल्या नवलपूर नगरीतील एका जंगलातील गुहेत रहात होता. त्या जंगलात भयं-कर हिंस्र प्राणी व विषारी जनावरे होती. शिवाय चक्रदंतीच्या गुहेसभोवती व गुहेत राक्षसांचा कडेकोट पहारा होता. चक्रदंतीने अनेक देशांच्या राजपुत्रांना व राजकन्यांना पळवून आणून आपल्या गुहेत ठेवले होते. तसेच त्याने राजपुत्र संतोषकुमारला गुहेत आणून ठेवले. पण ही हकीकत राजा सुखदेवाला आणि संतोषपूरच्या नागरिकांना कशी समजणार? कोण सांगणार? राजाचे सेनापती सैनिकांना घेऊन राजपुत्राचा शोध करीत होते. दाही दिशांना राजपुत्राच्या शोधासाठी लोक गेले होते व कसून शोध चालला होता. पण राजपुत्र कुणालाच सापडत नव्हता.

राजाने राजपुत्र नाहीसा झाल्यावर दुसऱ्याच दिवशी सर्व नगरीत दवंडी पिटवून जाहीर केले होते की; "जो कोणी राजपुत्राचा शोध लावील आणि त्याला परत नगरीत सुखरूप आणील त्याला संतोषपूरचे अर्धे राज्य दिले जाईल."

# जादूच्या नारळामुळे राजपुत्राचा शोध

राजपुत्र संतोषकुमार बेपत्ता झाल्यापासून संतोषपूर नगरीवर दुःखाची छाया पसरली होती. राजा-राणीने तर अंथरुणच धरले होते. प्रजेलाही अन्न गोड लागत नव्हते. राजाच दुःखी तर प्रजा कशी सुखी रहाणार ? नाना देशाचे प्रवासी येत होते. वीर पुरुष येत होते. राजपुत्राविषयीची माहिती, त्याचे स्वभाव व स्वरूप वर्णन ऐकून घेऊन त्याच्या शोधासाठी जात होते पण तो कुणालाच सापडत नव्हता.

एके दिवशी झोपेत मंगलाला स्वप्न पडले. “ मंगला, बाळे उठ, धाडस दाखव. राजपुत्राच्या शोधासाठी घराबाहेर पड. मी जादूचा नारळ तुला सहाय्य करीन. काही काळजी करू नकोस. फक्त मला बरोबर घे व नीघ व गरजेनुसार मला हुकूम करीत जा. काम सांगत जा. तूं मुलगी आहेस. मुलगे सगळेच धाडसी–प्रतापी असतात. तूही प्रतापी बन. तुझ्या अंगचे धाडस दाखविण्याची वेळ आली आहे. उशीर करू नकोस. सारे गोड होईल. तुझ्या नावाप्रमाणे मंगल होईल. ”

मंगला झोपेतून जागी झाली. तिने वामनभटजींना स्वप्न सांगितले. वामनभटजींचा जादूच्या नारळाच्या चमत्कारावर विश्वास होता. ते म्हणाले, “ मंगला, तूं जरूर जा. देव तुझ्या कार्यात सतत तुझा पाठीराखा राहो व तुला यश लाभो. ”

मंगलाने तो जादूचा नारळ बरोबर घेतला व ती राजपुत्र संतोषकुमारच्या शोधार्थ घराबाहेर पडली. घराबाहेर पडताना

तिने वामन भटजींना व आई सत्यवती हिला मनोभावे नमस्कार केला. दोघांनी डोळ्यात अश्रू आणून तिला निरोप दिला.

कधी घनदाट अरण्यातून तर कधी रखरखीत वाळवंटातून, कधी नदी-नाल्यातून तर कधी डोंगर-पठारावरून, केव्हा उन्हातून तर केव्हा थंडीवाऱ्यातून चालत होती. प्रवासात ती केवळ नारळापासून मिळणारे दुधच पीत होती. फिरत फिरत ती शेवटी नवलपुरला येऊन पोहचली. पण तिला आता चक्रदंती राक्षसाची गुहा कशी सांपडणार ? तिने नारळाची प्रार्थना केली, " हे श्रीफला, मला तूं इथपर्यंत आणलेस, आता मला चक्रदंती राक्षसाची गुहा कुठे आहे ती सांग. "

नारळ म्हणाला, " मंगले, उत्तर दिशेने चालू लाग. कांही मैल चालून गेल्यावर तुला एक तळे दिसेल. त्या तळ्याच्या दक्षिण बाजूस एक जंगल दिसेल. त्याच जंगलात चक्रदंतीची गुहा आहे. "

नारळाच्या सांगण्याप्रमाणे मंगला उत्तर दिशेने काही मैल चालून गेली. तेव्हा तिला एक तळे दिसले. त्या तळ्याच्या दक्षिण बाजूस जंगल होते. पण ते जंगल अतिशय घनदाट होते व वाघ, सिंह तेथे दिवसा सुद्धा फिरत होते. मंगलाने देवाचे नाव घेत घेत त्या जंगलातून मार्ग काढला. तिला राक्षसाची गुहा दिसली. तिने मनात म्हटले, इथपर्यंत आपण आलो. आता सावधगिरीने वागले पाहिजे. कारण आताच आपली खरी कामगिरी सुरू होणार आहे. तिने नारळाची पुन्हा प्रार्थना केली, "हे श्रीफला, मी तुझ्या सांगण्यावरूनच राजपुत्राच्या शोधासाठी

घराबाहेर पडले व इथपर्यंत आले. आता मला मी पुढें काय करूं ते सांग. तुझ्याच मार्गदर्शनाने व सहाय्याने मी माझे कार्य करणार आहे."

तेव्हा तो जादूचा नारळ म्हणाला, "मुली, चक्रदंतीच्या गुहेत व गुहेबाहेर क्रूर व दुष्ट राक्षसांचा कडेकोट पहारा आहे. व ते सर्वजण डोळ्यात तेल घालून पहारा करीत आहेत. तरी माझ्या दुसऱ्या डोळ्याला तूं वाद्यांचे सूर काढण्याची आज्ञा कर. माझे जादूचे सूर त्यांच्या कानी पडताच ते सर्वजण कायमचे झोपी जातील."

मंगलेनें नारळाची प्रार्थना करताच त्याच्या दुसऱ्या डोळ्यातून बासरी, झांज, मृदंग वगैरे वाद्यांचे सूर निघू लागले. जादूच्या नारळाच्या डोळ्यातून निघणारे ते सूर पहारेकरी राक्षसांच्या कानावर पडताच एकाएकी त्यांचे डोळे पेंगुळायला लागले व थोड्याच वेळात ते अगदी गाढ झोपी गेले व घोरू लागले. सर्व राक्षस झोपी गेल्यावर मंगला गुहेत शिरली. गुहेतील पहारेकरीही जादूच्या नारळातून निघणाऱ्या वाद्यांच्या सुरांमुळे झोपी गेले होते. मंगलाने गुहेत पाहिले. गुहेत अनेक खोल्या होत्या व त्या धनधान्याने भरलेल्या होत्या, पण आत कुणाचीच चाहुल तिला लागेना. तेव्हां तिने नारळाची प्रार्थना केली; मार्गदर्शनाची अपेक्षा बोलून दाखविली. नारळ म्हणाला, "मुली, यावेळी चक्रदंती राक्षस बाहेर गेलेला आहे. थोड्या वेळाने तो परत येईल. त्यावेळी तुला त्याच्याशी लढाई करावी लागेल. तरी तू आता लपून बस."

मंगला म्हणाली, "मी लपून बसते पण अगोदर मला राजपुत्र संतोषकुमार कुठे आहे ते दाखव." नारळ म्हणाला, "इथे जी खोली बंद आहे त्या खोलीत राजपुत्र संतोषकुमार व इतर देशांचे राजपुत्र व राजकन्या आहेत. तुला जर त्यांना पहायचे असेल तर माझा जो तिसरा डोळा आहे त्याचा उपयोग करून पहा. नारळाचा तिसरा डोळा गुप्त वस्तु दाखविणारा होता. मंगलेने नारळाच्या तिसऱ्या डोळ्यातून पाहिले. तिला त्या बंद असलेल्या खोलीतील दृश्य दिसले. तिथे बंदीत टाकलेल्या प्रत्येक राजपुत्र व राजकन्येच्या हातापायात बेड्या अडकविलेल्या होत्या. राजपुत्र संतोषकुमारच्या हातापायात बेड्या होत्या.

काही वेळ झाला आणि नंतर मोठमोठ्याने गर्जना करीत चक्रदंती राक्षस गुहेकडे येत असल्याचे तिने पाहिले. राक्षस गुहेजवळ आला. पाहतो तर काय? आपले सर्व पहारेकरी मूर्च्छा येऊन पडलेले. गाढ झोपलेले व घोरत असलेले. त्याने एकेकाला उठविण्याचा प्रयत्न केला पण कुणीच उठेना. तेव्हा तो समजला की कुणीतरी आले असून आपणास धोका आहे.

चक्रदंती गुहेत शिरला. नारळाच्या सांगण्याप्रमाणे मंगला लपून बसली होती त्यामुळे ती त्याच्या दृष्टीस पडली नाही. मात्र राक्षसाला गुहेत शिरलेले पहाताच मंगला घाबरली. तथापि तरीही ती सावध राहिली. राक्षस सर्व गुहा शोधत फिरू लागला. कारण त्याला गुहेत कुणीतरी आल्याचा वास आला होता. त्याने कसून शोध केला तेव्हा त्याला मंगला दिसली. तो तिला पकडणार तेवढ्यात जवळच असलेली तलवार मंगलेने उचलली व तिने त्याच्याशी लढाई सुरू केली. राक्षसाच्या

गुहेत त्याची गदा, धनुष्यबाण वगैरे युद्धाची आयुधे खुंट्यां-
वरून टांगलेली होती. राक्षसाने मंगलेच्या हातातील तलवार
आपल्या हातातील एका शस्त्राने खाली पाडली तेव्हा मंगलेने
मग गदा घेतली व ती लढू लागली. पण बोलून चालून ती
मुलगी. ती राक्षसाशी काय लढणार? तरीही तिने होता-
होईतो राक्षसाशी दोन हात केले. राक्षसाचा पाडाव होत नाही
असे पहाताच मनातून मंगलेने जादूच्या नारळाची प्रार्थना केली
की, "हे श्रीफला, मला या संकटातून सोडव. राक्षसाचा मृत्यु
कसा येईल ते सांग."

नारळ म्हणाला, "ते मी सांगणारच होतो पण प्रथम
तुझ्या धाडसाची व शौर्याची परीक्षा घेतली. मंगले, तूं शूर
आहेस. आता असे कर. प्रथम राक्षसाच्या गळ्यातील
मण्याची माळ तोड. माळ तुटली की राक्षस मरून पडेल."
मंगलेने मग युक्ति योजली. ती राक्षसाला म्हणाली, "हे
महापराक्रमी राक्षसराज, मी तुला शरण आले आहे. शरण
आलेल्याला शूर व प्रभावी वीर कधीही मरण देत नाही. तरी
तूं माझ्यावर दया कर. मी तुझी दासी होऊन राहीन."

हे ऐकताच राक्षसाला आनंद झाला. राक्षसाने मग तिच्याशी
युद्ध करायचे बंद केले. राक्षस म्हणाला, "तूं माझी बायको
होऊन रहा. मी तुला त्रास देणार नाही. माझ्याशी आजवर कुणीही
लढले नाही पण तूं मात्र लढलीस. तुझे मी कौतुक करतो."

मग मंगला गुहेत राहिली व संधि साधून चक्रदंती एकदा
झोपलेला असताना तिने त्याच्या गळ्यातील माळ तोडली.
माळ तोडताच चक्रदंती मरण पावला. मंगलेने नारळाची

विनवणी केली व बंद खोलीतील राजपुत्र संतोषकुमारची कशी सुटका करायची ते विचारले. नारळ म्हणाला, "माझ्या तिसऱ्या डोळ्याने पहा. एका रांजणात बंद खोलीच्या दाराची किल्ली आहे. ती घे व दार उघड." मंगलेने नारळाच्या डोळ्यातून पाहिले. रांजणात किल्ली होती. तिने ती घेतली. बंद खोलीचा दरवाजा उघडला व सर्व राजपुत्रांची व राजकन्यांची त्यांच्या हातापायातील बेड्या काढून सुटका केली. प्रत्येकाची विचारपूस करून त्यांना आपआपल्या देशी पाठविले. राजपुत्र संतोषकुमारला तिने सर्व हकिकत सांगितली. संतोषकुमारला फार आनंद झाला. त्याने मंगलाचे आभार मानले. नंतर गुहेतील सर्व धनधान्य घेऊन ती दोघे संतोषपुरला आलीं. राजाराणीने संतोषकुमारला पाहिलें. तीं प्रेमाने त्याला भेटलीं. सर्वांना आनंद झाला. सर्वांनी मंगलेच्या धाडसाचे व कर्तबगारीचे कौतुक केले. राजा सुखदेवाने तर मंगलेला आपली सून म्हणून घोषित केलें. वामनभटजींना बोलावून घेतलें. त्यांची क्षमा मागितली. वामनभटजी फार आनंदित झाला. पुढे राजपुत्र संतोषकुमार व मंगला योग्य वयाची होताच एका मुहूर्तावर त्यांचा अत्यंत थाटात विवाह केला. विवाहप्रसंगी मंगलेने चक्रदंतीच्या गुहेतून सुटका केलेल्या सर्व राजपुत्रांना आणि राजकन्यांना आमंत्रण पाठविले. सर्वजण लग्नाला आले.

मंगलाच्या धाडसामुळे व जादूच्या नारळामुळे सर्व ठीक-[illegible] [illegible] वामनभटजींनी तो जादूचा नारळ देव्हाऱ्यात नित्यनेमाने त्याची पूजा करू लागले.

❀ समाप्त ❀

BVBK-0400364